# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३३/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. भिमराव रामचंद्र कुलकर्णी,<br>स्वागतनगर, कुर्डुवाडी रोड,<br>हायवे कॅन्टीनमागे,<br>बार्शी, जि. सोलापूर. | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>संवसु मंडळ कार्यालय, जुने मिल कंपाऊंड,<br>सोलापूर.<br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>सं.व सु. विभाग<br>बार्शी, जिल्हा-सोलापूर.<br>३) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग, करमाळा, जिल्हा-सोलापूर.<br>४) सहाय्यक अभियंता<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग, कुर्डुवाडी, जिल्हा-सोलापूर.<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :-** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. भिमराव रामचंद्र कुलकर्णी, रा. बार्शी, जिल्हा–सोलापूर यांनी आपल्या मालकीच्या अंजनगांव (उ.) येथील शेती पंपाच्या मिटरचे रिडींग न घेता चुकीचे वीज बिल आकारल्याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सोलापूर येथे विहित नमुन्यांत तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने पारीत केलेल्या आदेशा विरूध्द प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दि. १८–८–२००७ रोजी दाखल केले आहे. त्यास अनुसरून प्रकरणी सुनावणीची अंतीम तारीख २८–९–२००७ रोजी विभागीय कार्यालय बार्शी येथे ठेवण्यांत आली होती. दरम्यानचे मुदतीत तक्रारदार श्री. भिमराव कुलकर्णी यांनी मंचास असे कळविले आहे की महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, बार्शी यांनी बिलामध्ये योग्य ती दुरूस्ती केली असल्याने आता त्याबाबत त्यांची कसलीही तक्रार राहिलेली नाही. सहाय्यक अभियंता (संवसु), उपविभाग कुर्डुवाडी यांनीही तसा अहवाल मंचास सादर केला आहे. सदरचे प्रकरणी श्री. एम.बी. भाजीभाकरे, कार्यकारी अभियंता, विभाग बार्शी यांनी तत्परतेने लक्ष घालून ग्राहकाची तक्रार निवारण करण्यास मोलाचे सहकार्य केले. त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

श्री. भिमराव कुलकर्णी यांनी आपल्या वीज बिलाच्या तक्रारीचे निवारण झाले असल्याचे कळविल्यावरून त्यांनी दि. १८–८–२००७ रोजी मंचामध्ये दाखल केलेले अपील निकाली ठेवले आहे.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( के. व्ही. पाटील )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर